मकर संक्रांत १९२३

# युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक
ऑक्टोबर–नोव्हेंबर–डिसेंबर २०१९






ट्विलाईट – प्रभाकर पाटील



आंगण – प्रभाकर पाटील



आफ्टर द रेन्स – प्रभाकर पाटील

मकर संक्रांत १९२३

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्‌मयीन नियतकालिक
वर्ष ७४ वे
ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१९

# युगवाणी

संपादक
प्रफुल्ल शिलेदार

**संपादक**
प्रफुल्ल शिलेदार

**मुखपृष्ठ क्र.** १ (हंसध्वनी), २ (ट्विलाईट), ३ (आंगण, आफ्टर द रेन्स्) वरील चित्रे प्रभाकर पाटील यांची आहेत.

**आतील रेखाटने :** राजू बावीस्कर
भास्कर लक्ष्मण भोळे यांची छायाचित्रे हिरण्मय भोळे यांच्या संग्रहातून साभार.
इतर छायाचित्रे आंतरजालावरून व लेखकांच्या व्यक्तिगत संग्रहातून साभार.

**मुखपृष्ठावरील सुलेखन :** चंद्रमोहन कुलकर्णी

**संपादकीय पत्रव्यवहार**
प्रफुल्ल शिलेदार, ६अ, दामोदर कॉलनी, सुरेंद्रनगर, नागपूर – ४४० ०१५
ई–मेल : edityug@gmail.com

**प्रकाशक**
विलास मानेकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर–४४० ०१२
दूरध्वनी : ०७१२–२५२३९२९, २५५३७६७

**जाहिरात सहयोग :** प्रदीप दाते, वर्धा

**मुद्रितशोधन :** दीपक रंगारी

**अक्षरजुळणी व मुद्रण :**
माधव लोखंडे, मलय ग्राफिक्स, सुभाषनगर, नागपूर । भ्रमण : ९३२६९९९०१५

**युगवाणीच्या वर्गणीबाबत सूचना :**
– युगवाणीची वर्गणी आपण 'युगवाणी–विदर्भ साहित्य संघ' या नावाने धनादेशाद्वारे पाठवू शकता.
– युगवाणीची वर्गणी थेट बँक खात्यातही जमा करता येईल.

Bank Account :
**'YUGWANI-VIDARBHA SAHITYA SANGH'**
Bank of Baroda, Sitabuldi Branch, Nagpur
**A/c. No.: 04650100 005638**
RTGS/IFSC Code : BARB0SITABU
Fifth Character is 'ZERO'

– युगवाणीची वर्गणी संपली असल्यास नूतनीकरण अवश्य करावे.

**व्यवस्थापन :**
**वर्गणीबाबत आणि अंक नियमित मिळण्याबाबत संपर्क :**
नितीन सहस्रबुद्धे, व्यवस्थापक, युगवाणी, द्वारा : विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकुल,
झाशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर–४४० ०१२ । भ्रमणभाष : ९४२३१०३३०१

**प्रकाशनाची कालनियतता :** त्रैमासिक (जाफेमा, एमेजू, जुऑस, ऑनोडि)

**या अंकाचे देणगी मूल्य : १०० रुपये**
**वार्षिक वर्गणी : २०० रुपये,  त्रैवार्षिक वर्गणी : ५०० रुपये**
**वि.सा. संघाच्या आजीव सभासदांना युगवाणीचे अंक मिळण्याकरिता विशेष सवलतीत त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये भरणे गरजेचे आहे.**

- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने 'युगवाणी'च्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे.
- या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी महाराष्ट्र शासन, म.रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई तसेच युगवाणीचे संपादक आणि विदर्भ साहित्य संघाचे पदाधिकारी सहमत असतीलच असे नाही.

यु ग वा णी । ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१९

# अं त रं ग

**कविता**
अनुराधा पाटील/५
प्रभा गणोरकर/८
मल्लिका अमरशेख/११

**स्मरण : भास्कर लक्ष्मण भोळे**
डॉ. भा. ल. भोळे : सार्वजनिक विचारवंत : यशवंत सुमंत/१३
डॉ. भा. ल. भोळे : भेदाकडून अभेदाकडे नेणारा वैचारिक प्रवास : किशोर बेडकिहाळ/२२
डॉ. भा. ल. भोळे : एक सामाजिक व्यक्तिमत्त्व : डॉ. श्रीनिवास खांदेवाले/३६

**पुनर्वाचन :**
बहुसंस्कृतिकवाद आणि मराठी साहित्य : भा. ल. भोळे/३९

**दृश्यकला :** छायाचित्रण
हेलेन लेविट : नितीन दादरावाला/४७

**समीक्षा विशेष :**
चंद्रकांत पाटील यांची कविता : वसंत पाटणकर/५४
महात्मा : तीन स्मरणकविता : चंद्रकांत पाटील/७०

**वाचकाच्या नोंदी :**
जॉर्ज ऑरवेलचे निबंध : अविनाश कोल्हे/७३

**आत्मकथन** (क्रमशः)
काळ्या निळ्या रेषा : राजू बावीस्कर/८२

**कवितांतर :** समकालीन जर्मन कविता /८७
आन्द्रेआज आल्टमान, यान वाग्नर, केर्स्टिन प्राइवूस,
ख्रिस्टियान फिलिप्स, उलरिक आल्मुट झांडिग
टिपण व अनुवाद : जयश्री हरि जोशी

विदर्भ साहित्य संघ कार्यवृत्त/१०२

# संपादकीय...

**समाज** हे मानवांमधील परस्परसंबंधांचे एक विशाल जाळे आहे असे मानले गेले आहे. या परस्परसंबंधाच्या आंतरिक व्यवस्थेचे स्वरूप जटिल आहे. या व्यवस्थेतील अंतःक्रियांच्या मुळाशी कार्यरत असलेल्या घटकातून सामाजिक मूल्यसिद्धान्त तयार होत जातात. समाजातील अंगभूत गतिशीलतेमुळे अनेक परिवर्तने सतत घडत असतात. सामाजिक व्यवस्थेचा भाग असूनही या व्यवस्थेचे सम्यक भान समाजातील प्रत्येक घटकाला राहीलच असे नसते. यासाठी सारासार विचार करून, परिस्थितीचे नेमके आकलन करून, बदलत्या मूल्यव्यवस्थेचे विश्लेषण करून त्याबाबत समाजाला सतर्क ठेवण्यासाठी समाजाला विचारवंतांची नेहमीच गरज भासत आलेली आहे. विद्याशाखीय अभ्यास, सखोल चिंतन आणि विचार प्रकटपणे मांडायला लागणारी निर्भयता विचारवंताकडे असते. समाजाचा अनेक अंगांनी अभ्यास करून, त्यावर विचार करून, वास्तवाच्या मुळाशी जाऊन तारतम्याने भूमिका घेऊन ती स्पष्टपणे मांडणाऱ्या विचारवंताची समाजात निकड असते. समाजातील मोठ्या वर्गाला समाजात सुरू असलेल्या घडामोडींचे नेमके सखोल विश्लेषण करून त्यामागील कार्यकारणभाव समजून घेता येत नाही. अनेकदा वरवरच्या तात्कालिक गोष्टी, भ्रामक प्रचारातून रेटलेल्या गोष्टी याच खऱ्या समजून सर्वसामान्य लोकांकडून प्रतिक्रिया दिली जाते. अशा वेळेस एक ठाम प्रगतिशील वैचारिक बैठक असलेली, लोकशाहीवर विश्वास असलेली, समता हे अपरिहार्य मूल्य मानणारी, स्पष्टपणे सत्याचा उच्चार करणारी व्यक्ती समाजाला योग्य ते दिशादर्शन करू शकते, विचार करायला भाग पाडू शकते आणि साधकबाधक विचार करून योग्य निर्णय घेण्यास मदत करू शकते. बदलत जाणाऱ्या सामाजिक वास्तवाची चिकित्सा, संस्कृतीबद्दल चिंतन, घडत असलेल्या घटनांचा राजकीय आशय काय असू शकतो याचे विश्लेषण हे सगळे समजून घ्यायला व्यासंग आणि बुद्धिमत्ता असलेल्या विचारवंताची त्यामुळेच नेहमी गरज असते.

समता, सहिष्णुता आणि न्याय यावर आधारित असलेल्या समाजाची आपल्याला गरज असतानाच्या काळात दिशाभूल करणाऱ्या कृतक विचारवंतांचेही पेव फुटलेले आढळून येते. भरकटून टाकणारी विचारसरणी, रसातळास नेणारे मार्ग, मानवतेच्या विरुद्ध दिशेने जाणारी वाटचाल हेदेखील एखाद्या विचारसरणीचेच अपत्य असते. अशा गदारोळातून आपला मार्ग जो तो आपल्यापरीने आणि बुद्धीने काढत असतोच; परंतु आपला मार्ग काढताना आपल्याला ज्याच्या प्रबोधनाने मदत होऊ शकते असा हा जगण्याच्या वाटचालीत अपरिहार्य असलेला, समकालावर सूक्ष्म नजर ठेवून असलेला वाटाड्या हल्ली नामशेष होण्याच्या वाटेवर आहे. त्याची जागा नवे माध्यमतज्ज्ञ, जाहिराततज्ज्ञ, संगणकतज्ज्ञ, विदा विश्लेषक घेत आहेत आणि आपापल्या माहितीचा अमानुषपणे मारा करीत आहेत. माणूस म्हणून जगायला मदत करणाऱ्या विचारवंतांची परंपरा आता यापुढे फक्त इतिहासातच दिसेल की काय, वास्तवात दिसणारच नाही की काय अशी शंका यावी अशी परिस्थिती हळूहळू येत आहे.

खरे तर व्यापक परिप्रेक्ष्यातून विचार, लोकशाहीवादी भूमिका, परमताचा आदर, भिन्न जीवनशैलीचा मान, समताधिष्ठित मानवी जीवनाबद्दल सतत ध्यास या साऱ्या गोष्टींनी युक्त अशा कृतीशील पुरोगामी विचारवंतांचा मोठा वारसा आधुनिक महाराष्ट्राला लाभलेला आहे. यातील महत्त्वाचे नाव भास्कर लक्ष्मण भोळे यांचे होते. २४ डिसेंबर २०१९ रोजी त्यांच्या निधनास दहा वर्षेपूर्ण होत आहेत. भा.ल. भोळे अनेक वर्षेविदर्भ साहित्य संघाचे उपाध्यक्षही राहिले होते. त्यांच्या निधनानंतरही त्यांच्या अप्रकाशित आणि असंकलित लेखनाची अनेक पुस्तके प्रकाशित होत आहेत. आजच्या बेचैन करणाऱ्या काळात तर भा.ल. भोळ्यांसारख्या विचारवंताची महाराष्ट्रात प्रकर्षाने उणीव भासते आहे. महाराष्ट्राचा वैचारिक वारसा संपन्न करणाऱ्या भा.ल. भोळे यांच्या वैचारिक प्रवासातील साथीदारांचे भोळे यांचे अनन्यत्व अधोरेखित करणारे महत्त्वाचे लेखन या अंकातील एका विशेष विभागात देऊन आम्ही त्यांच्या स्मृतींना उजाळा देत अभिवादन करीत आहोत.

– प्रफुल्ल शिलेदार

कविता

## अनुराधा पाटील यांच्या कविता



■

### आलेख

माणसं भेटतात
जुन्या दिवसांची चुटपुटती
ओळख देत
हसतात ओशाळवाणी
डोळ्यातलं पाणी लपवत
खुशाली दाखवताना
माणसं बुजतात
माझ्या चकपक कपड्यांना
आणि झाकतात
विरलेल्या वस्त्रात
त्यांच्या दैन्याची
उघडी पडणारी मुळं
त्यांच्यात आणि आपल्यात
पडलेला दुरावा
असा कशातूनही झिरपत राहतो
आसपास

सांगता येत नाही
कशाची अजस्र सावली
सरकत जाते
त्यांच्या माथ्यावरून
आणि कुणा ना कुणापर्यंत
पोहचण्याचा आकांत
वारा होऊन उडून जातो
बिनदिक्कत

ते शोधतात थोडीशी जागा
एखाद्या कवीच्या
कल्पनेत
पण नसतात कुठल्याच
पंगत – पत्रावळीत
अग्रक्रमानं
आणि पितात पाणी
हाताची ओंजळ करून
पानझडीतल्या झाडासारखे
ते नसतात
मी वाचते त्या पुस्तकांमध्ये
आणि नसतात
निरर्थ दुःखांच्या
काळ्या किनारीनं सजवलेल्या
चलचित्रांच्या
देखण्या चौकटींमध्ये

हैराण होते सटवाई
पिढी दर पिढी
की जन्माला येणाऱ्या
नवजाताला
कुठल्या सदरात टाकावं ?
महापुरात बुडवावं
त्याचं घरदार
की दुष्काळाच्या काहिलीनं
त्राही त्राही आरपार
असावं त्यानं कुपोषित
कुठल्याही जातीचं लेबल
मिरवताना
की धर्माच्या आंधळ्या झुंडीत
गमवावेत त्यानं
निर्दोष मायबाप
आणि पडक्या घराच्या
उंबरठ्यावर बसून

पाहावी आजन्म वाट
हरवलेल्या छत्राची?
देशकाळाच्या सीमा ओलांडून
असावं सतत त्यानं
बंदुकीच्या धाकाखाली
की अण्वस्त्रांच्या हजारो सूर्यांनी
उजळावी त्याची वाट
भविष्यातली?
हैराण होतेय सटवाई
की थोड्याशा कर्जाची
आणि ढीगभर अर्जांची
ही कहाणी
कशी करावी सुफळ
झाडाला लटकून झुलताना...

माये, मी शोधतेय
अनेकांच्या हयातीचा दाखला
तुझ्या जीर्ण पट-पडताळणीत
जिथं जात नाही
आजच्या मरणाला
उद्याची रात्र आडवी
पण तुझे करकरीत
कोरे कागद
निदान थोडे भिजू दे
मिळू दे ओलावा
अक्षरांना,
पदराखाली लेकरू पाजत
बसलेल्या बाईच्या दुधाचा

बाकी तर
हा अवघा डोंगर
तसा पोकळच
निःसंगाच्या करंगळीवर
तोलतानाही
खचत जाणारा
घेता श्वास जाता श्वास
तसूतसूनं
•••

**नकार**

खूप पाणी वाहून गेलंय
पुलाखालून
माणसाच्या आटलेल्या
डोळ्यांसारखेच
कोरडे पडले आहेत नदीनाले
आणि भेगाळली आहे भुई
मैलोगणती

पुरत नाहीय आजकाल
नुसती कवी असण्याची ऊब
आणि मुलीनं
चित्रात रंगवलेला
फाटका माणूस येतच नाहीय
कागदाच्या बाहेर
ज्याच्यासमोर उघडता येईल
आपली रिकामी मूठ

मुलगी विचारतेय
स्वतःलाच
निर्वासितांच्या छावणीत
जन्माला आलेली मुलं
कुठल्या देशाची असतात
कुणाची बोलतात भाषा
जी कळत नाही
छत्र चामरं घेऊन
फिरणाऱ्या फिरंग्यांना

आणि ते तर येतात बेघर
पुन्हा पुन्हा
हरळीच्या पात्यासारखे
फटीतून मातीतून
हवेतून पाण्यातून
दगडाखाली अडकलेले
हात घेऊन
उन्हाच्या कापणीला
भिडणारे
आणि सापडतात अश्राप